# MULTIDISCIPLINARY RESEARCH

Prof. Rajani Shikhare

MULTIDISCIPLINARY RESEARCH - Prof. Rajani Shikhare

| | | |
|---|---|---|
| **Publisher** | : | Anand Prakashan,<br>Jaisingpura, Aurangabad.(M.S)<br>Cell : 9970148704<br>Email: anandprakashan7@gmail.com |
| © | : | Author |
| **Typeset At** | : | Anand Computer<br>Aurangabad. |
| **Edition** | : | December 2020 |
| **ISBN No** | : | 978-93-90004-07-2 |
| **Cover Design** | : | Aura Design<br>Mumbai. |
| **Printed At** | : | Om Offset<br>Aurangabad. |
| **Main Distributor** | : | Anand Book Depot<br>Jaisingpura, Aurangabad - 431004 |
| **Price** | : | ₹ 120 /- |

# MULTIDISCIPLINARY RESEARCH

## INDEX


| Sr.No | Title | Page. No |
|---|---|---|
| 01. | विनय मिश्र की ग़ज़लों में राजनीतिक चेतना - **प्रो.रजनी शिखरे** | 07-09 |
| 02. | संत साहित्य में विवस्था का विरोध - **राजाराम बाबासाहेब जाधव** | 10-12 |
| 03. | स्वातंत्र्योत्तर भारत की विसंगतियो का महत्वपूर्ण दस्तावेज : 'पूरब खिले पलाश'-**संतोष नागरे** | 13-17 |
| 04. | होय ! लेखक घडवता येऊ शकतो - **डॉ. समाधान इंगळे** | 18-21 |
| 05. | अण्णाभाऊ यांची लोकनाट्ये - **डॉ.संदीप अ.बनसोडे** | 22-26 |
| 06. | "आधुनिक कुटूंब व्यवस्थेतील नाते संबंधातील द्वंद्वावर भाष्य करणारे नाटक - नथिंग टु से" - **डॉ. संदिप बनसोडे** | 27-29 |
| 07. | Realism In R.K.Narayan's Novel The GUIDE' - **Dr.V.S.Bandal** | 30-38 |
| 08. | Absurd Elements in Harold Pinter's The Birthday Party, The Caretaker and The Homecoming. - **Jadhav Arun Malhari** | 39-41 |
| 09. | Global and International Evidence-Based Library Activities and Demand of Health Librarians - **R.B. Pagore** | 42-52 |
| 10. | Study of Second ARCs view on Police Reforms. - **Hanmant B.Helambe** | 53-57 |
| 11. | Capital Formation In Agricultural Sector - **Mr B. S Jogdand** | 58-61 |
| 12. | 'Farmer suicide a social problem' - **Mr. R. B. Kale** | 62-66 |
| 13. | The Role of Opposition Party In Indian Democracy. - **Dr. S.N. Satale** | 67-71 |
| 14. | Impact of E-Commerce in Rural India - **Dr. Waykar Vivek** | 72-77 |
| 15. | A Study of Commercial Agriculture: Issues and Challenges before ancestor agriculture in India. - **Sandip B. Vanjari** | 78-82 |
| 16. | Synthesis, Characterization and Antimicrobial Analysis of Some New Pyrimidines Containing Pyrazole Moiety. - **Amol J. Shirsat*, Balaji D. Rupnar, Sunil S. Bhagat** | 83-88 |

4

# होय ! लेखक घडवता येऊ शकतो

**डॉ. समाधान इंगळे**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड

महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद शाळा म्हणजे बंद पडत चाललेल्या शाळा, पालक पाल्यांना शिकवू इच्छित नाही अशा शाळा,सरकारला चालवण्याची इच्छाच नाही अशा शाळा, समाजाचे प्रशासनाचे प्रचंड दुर्लक्ष असलेल्या शाळा असे बोलले जाते. जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडण्याचे, शिक्षकांची भरती न होण्याचे किंवा गावोगावी सेमी आणि इंग्रजीचा सुळसुळाट झाल्याचे वर्तमानपत्रात वाचून काहीही वावगे वाटत नाही. अनेक भाषा अभ्यासकांनी मातृभाषा हेच शिक्षणाचे खरे माध्यम आहे आणि मातृभाषा हेच ज्ञान निर्मितीचेही ही सर्वात प्रभावी माध्यम आहे असे सांगितलेले आहे. तरीही मराठीतून शिकवणाऱ्या आणि मराठीतून रचनात्मक ज्ञान निर्माण करणाऱ्या या शाळांच्या गळ्याला नख लावण्याचे पाप सुरू आहे. शिक्षण आणि साहित्य हा फार जवळचा संबंध आहे. बहिणाबाई चौधरी या अशा अपवाद असलेल्या कवियत्री आहे की ज्यांच्याकडे शिक्षण नव्हते मात्र प्रतिभेची अमोघ देणगी होती. परंतु बहुतांश ऋषी-मुनी, संत, विचारवंत, संशोधक, तत्त्वज्ञ यांच्याकडे लेखन कला असल्यामुळेच ते आपल्या साहित्याला, संशोधनाला, तत्त्वज्ञानाला अक्षररूप देऊ शकले.अनेक साहित्य अभ्यासकांनी 'लेखक हा जन्माला यावा लागतो' याविषयी फार मोठे लेखन केलेले आहे. 'प्रतिभा ही वेडाची बहिण आहे', 'लेखक जन्मालाच यावा लागतो', 'प्रतिभा ही उपजतच असते' ही वाक्य साहित्य, कला क्षेत्रात फारच गुळगुळीत झालेली वाक्य आहेत. त्यामुळे नवीन कलावंत, लेखक घडवता येत नाही किंवा प्रयत्नांच्या कसोटीवर लेखक होता येत नाही, हे अधिक ठासून सांगितलं गेलं. संस्कृत मीमांसकांनी 'प्रतिभा ही प्रयत्नसाध्य असते' अशी एक संधी दिलेली आहे. मात्र जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले गेले. संत ज्ञानेश्वर आणि भावंडं, बालकवी यांच्या वयाचा आणि लेखनाचा कसा अलौकिक संबंध आहे हे सातत्याने सांगितले जाते आणि त्यामध्ये तथ्यही आहे. मात्र आपला विषय असा आहे की लेखक घडवता येतो. जर योग्य मार्गदर्शन केले, योग्य सहवास लाभला, योग्य पद्धतीने त्याला आकार दिला गेला तर चांगला लेखक घडवता येऊ शकतो, हे अनेक कार्यशाळांमधून सिद्ध झाले आहे.

शेकडो बातम्या लिहिल्यानंतर जर एखादा पत्रकार चांगली बातमी लिहू शकत असेल, अनेक प्रयत्न करून जर आपण वळणदार अक्षर काढत असू, अनेकदा धडपडल्यानंतर जर सायकल व्यवस्थित चालवता येत असेल तर असे शेकडो प्रयत्न आणि धडपड यांची जोड असेल आणि इच्छाशक्ती असेल तर चांगली कविता, चांगली कथा नक्कीच लिहिली जाऊ शकते. नाटक आणि गाण्याचा अजिबात अर्थ माहित नसणारे अनेक विद्यार्थी युवक महोत्सवाच्या दरम्यान

आम्ही एकत्रित करतो. कार्यशाळेप्रमाणे त्यांच्याकडून तयारी करून घेतो आणि युवक महोत्सवात प्रचंड तयारी असलेल्या मुलांसमोर अत्यंत आत्मविश्वासाने त्यांचे सादरीकरणही करून घेतो. विशेष म्हणजे संगीत - नाटकाशी अनभिज्ञ असलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकेही मिळतात. मात्र शक्यतांची शक्यता शेतकऱ्यांच्या पाऊस पडण्याच्या आशावादासारखी असते. मनातून ती गोष्ट हवी असेल, आणि प्रयत्न करण्याची तयारी असेल तर प्रतिभा सुद्धा साध्य आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राक्षस भुवन शनीचे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग चौथी च्या ३४ विद्यार्थ्यांच्या गोष्टींचं पुस्तक 'गंमत गोष्टी' हे या प्रयत्न सिद्धीचं नितांत सुंदर असे फळ आहे. अधिक अनुभव आणि वाचनाचा साठा नसेल तर अधिक नाविन्यपूर्ण हाताशी लागण्याची शक्यता आहे. कारण अनुभवातून, इतरांचं ऐकून आणि वाचून त्यांच्याच वळणाची अभिव्यक्ती होत असते. मात्र जिथे निखळ निरागसता आहे, अननुभवी मन बुद्धी आहे, तिथे एका वेगळ्या आणि अनपेक्षित नव्या जगाची निर्मिती संभवू शकते. आपण या नव्या अनोळखी जगाच्या स्वागतासाठी रसिक, समीक्षक म्हणून सदैव तत्पर राहिले पाहिजे, स्वागतशील दृष्टीने तिकडे पाहिले पाहिजे.

'मतलबी माणूस', 'या कोल्ह्याचे करायचे काय ? खाली डोके वर पाय', 'थेंबे थेंबे तळे साचे', 'आयत्या बिळात नागोबा', 'असतील शिते तर जमतील भूते', 'लबाड लांडगा' यासारख्या प्रचलित ऐकीव गोष्टींचा प्रभावही या चिमुकल्या मनावर आहे, तर 'कुत्र्याने केली मदत', 'स्वाभिमानी सिंहीन', :घमेंडखोर साप', 'मुंग्यांचा लीडर', 'खारुताईची चिकाटी', 'शिट्टीवाला मासा', 'गोगल गायचा ढोल' अशी अगदी नवखी रूपके या बाल कथाकारांच्या कथांमधून आपल्याला वाचायला मिळतात.

'कुत्र्याने केली मदत' या पहिल्याच कथेत कल्पकतेची आगळीच चमक आहे. या कथेतील दोन शेतकरी त्यांचा संवाद हे राक्षसभुवन शनीचे या गावचेच चित्र असू शकते. कारण, मराठवाड्यात सगळीकडे दुष्काळ असताना राक्षसभुवन हे गाव गोदावरीच्या काठावर असल्याने उसाचे मळे आहेत. हा बाल कथाकार अभिषेक कचरे आपल्या अवतीभोवती दररोज उसाची शेती बघतो आणि त्यातून त्याला ही कथा सुचते. विशेष बाब म्हणजे धोंडीमामा नावाचा शेतकरी आपल्या मित्राला दामूला उसाच्या शेतात डुकरे घुसून पिकाची नासाडी करतात हे दु:ख सांगतो तेव्हा दामू त्याला विश्वास देतो की, मी माझ्या कुत्र्याला सांगून हे तुझे संकट दूर करेन. आणि तो त्याच्या कुत्र्याला म्हणतो की धोंडीमामाच्या उसात डुक्कर घुसले तर त्यांना तू हाकलून लाव, आणि कुत्राही आपल्या मालकाला 'ठीक आहे' असे म्हणतो. यातील दोन व्यक्तींमधील संवादासारखाच व्यक्ती आणि कुत्र्यातीलही संवाद आहे. खरी गंमत तर त्यानंतर. रानात डुक्कर दिसल्यावर कुत्रा ऊसात जाऊन डुकरांना तिथून निघून जाण्याचा आदेश करतो तेव्हा त्यातली डुकरीण म्हणजेच स्त्री डुक्कर अकरा पिलांची आई असते. आपल्या पिल्लांना घेऊन कुठे जावं? आणि कुठे गेलो तर कुत्रे पिलांना खाऊन टाकतील ही भीती व्यक्त करते. विशेष म्हणजे एका कुत्र्याजवळ पिलांना कुत्रे खाण्याची भीती व्यक्त करते. तेव्हा कुत्रा त्या डुकरीवर दया दाखवतो आणि सांगतो की, 'ठीक आहे तुम्ही उसात रहा मात्र ऊस खाऊ नका'. तेव्हा डुकरीण प्रतिप्रश्न करते की ऊस नाही खाल्ला तर मग आम्ही काय खाणार ? तेव्हा कुत्र्याने डुकरीन आणि तिच्या पिलांविषयी जो मानवतेचा भाव दाखवला ते एका विकसित माणसाचे रूप आहे. 'मी तुम्हाला भाकरी आणून देईल' असे डुकरीनीला आश्वासन देणारा कुत्रा आपला दिलेला शब्द पाळून रोज गावातून भाकरी गोळा करून आणून द्यायचा आणि डुकरीन व

तिचा परिवार ते खाऊन तृप्त व्हायचा. हळूहळू पिले मोठी झाली आणि मग कुत्रा म्हणाला 'आता तुम्ही जा' आणि रानातून सगळी डुकरं निघुन गेली. या कथेतून भूतदया, सहकार्य भावना यांचं एक उत्तम चित्र रेखाटलेलं आहे. मनुष्यप्राणी आणि इतर प्राणी यांच्यातील संघर्ष एका मानवी अंगाने सुटताना दिसतो. ही कथा एक बालकथा म्हणून आपण बघितली तर बालकांसाठी कथा लिखाण करणारांपेक्षा बालकथाकाराने लिहिलेली कथा ही अधिक बालकथा असू शकते, ह्याचेच हे उदाहरण आहे.

गोदावरीला 'गंगा' हे संबोधन आहे. गोदावरीच्या काठावरील अनेक जणांना ही गोदावरी आहे हे माहीत नसेल. ते नेहमीच अत्यंत श्रद्धेने गंगा हा शब्दप्रयोग करतात. 'खेळ' नावाच्या कथेत हा उल्लेख येतो. गंगेच्या किनाऱ्यावर खेकडा एकटाच बसलेला आहे. इथून या कथेला सुरुवात होते. चिलापी, मरळ, वांबट, डोकमासा, ईरुळा, कासव अशा स्थानिक जलचरांची नावे या कथेत फार सहज येतात. कबड्डी खेळत असणाऱ्या या पाण्यातील मासे आणि कासव यांची कबड्डी खेकडा खडकावर बसून बघत आहे. त्याला खेळण्याची इच्छा आहे. मात्र इतर जलचर त्याला सोबत घेत नाहीत. कारण त्याची नांगी लागण्याची भीती असते. आणि ही खंत मगरीजवळ तो बोलून दाखवतो. तेव्हा मगर मध्यस्थी करून त्याला अंपायर करण्याची सूचना करते आणि मग खेकडा खुश होतो. ही गोष्ट किती महत्त्वाची आणि किती विशाल हृदय असल्याची द्योतक आहे. आकाराने सर्वात मोठी असलेली मगर वडीलकीच्या भावनेने मधला मार्ग सुचवते आणि तो मान्य होतो. एकमेकांचे भक्षण करणाऱ्या या प्राणी जगाचं एवढं प्रेमळ वर्णन हे केवळ आणि केवळ एका बाल प्रतिभेलाच शक्य आहे. एका सुंदर निरागस आणि प्रेमळ विश्वाची कल्पना आणि त्या कल्पनेतून ही निर्मितीही तेवढीच निखळ आहे.

'माकडाची चतुराई' या कथेतील रमेश हा बैलगाडी घेण्यासाठी बाजारात जातो आणि दहा हजार रुपये किमतीची गाडी आठ हजार रुपयात मागतो. तेव्हा दुकानदार म्हणतो 'एक रुपयाही कमी होणार नाही, पण गाडीसोबत हे माकड फ्री येईल' एखाद्या वस्तूची किंमत कमी न करता त्यासोबत दुसरी एखादी वस्तू फ्री देण्याची ही बाजारवादी चाल या बाल कथाकाराच्या लक्षात आलेली आहे. आमीना आजी या कथेत सुरुवातीलाच 'जळगावात खूप पाऊस पडायचा त्यामुळे तिथले लोक खूप आनंदाने राहायचे' असे आले आहे. खूप पाऊस म्हणजे खूप आनंद हा या बालकथाकार मुलीवर झालेला संस्कार आहे. पाऊस पडण्याचा आणि गावाच्या आनंदाचा परस्पर संबंध तिने आपल्या बाल वयाच्या अनुभवातच आत्मसात केला आहे. आशुतोष पोटफोडे या बालकथाकाराची 'पाऊस सांगणारा कावळा' ही एक छोटी गोष्ट आहे. या गोष्टीत मुलीच्या लग्नाने चिंतीत शेतकऱ्याला कावळा मदत करतो. पाऊस पडत नाही म्हणून ऊस न लावणारा शेतकरी दुसऱ्या वर्षी कावळ्याच्या सांगण्यावरून उस लावतो. भरपूर पाऊस पडतो. शेतकऱ्याला ऊसाचे भरपूर उत्पन्न येते. त्यातून पैसे मिळतात, तो आपल्या मुलीचे लग्न करतो आणि कावळा जे सांगेल ते तो इतर सर्व शेतकऱ्यांना सांगून सर्व शेतकऱ्यांना श्रीमंत करतो. आपल्याला सुखाचा, श्रीमंतीचा मार्ग सापडला असेल तर तो इतरांनाही सांगावा ही एक सामाजिक बांधिलकीची गोष्ट हा छोटा कथाकार अत्यंत सुंदर पद्धतीने मांडतो. अंजली पोटफोडे या बालकथाकाराची 'घमेंडखोर साप' ही कथा आहे. घमेंडखोर सापाला चिमणी विचारते की 'तुझे अंडे जर कुणी फोडून टाकले तर तुला कसं वाटेल?' या कथेचे वैशिष्ट्य आहे की, सापाला कोणी अद्दल घडवत नाही किंवा काही नाही. मात्र सापाला विचार करायला भाग पाडणारे हृदय पिळवटून टाकणारे वाक्य चिमणी उद्गारते आणि रडत - रडत उडून जाते.

प्रत्येक गोष्टीचा शेवट हा अद्दल घडवणाराच असतोच असं नाही. तर चिमणीचे दु:ख व्यक्त होऊन एक शोकात्मिका या बालकथाकार विद्यार्थिनीने साधलेली आहे. संकेत कोंढरे या कथाकाराने 'मुंग्यांचा लीडर' या कथेतून भाऊ भावाला चुकीचे वागण्याने शिक्षा करतो असे चितारले आहे. चुकीचे वागणारा तो कोणीही असेल तरी त्याला पाठीशी न घालता शिक्षा देणे हा सत्याला मानणारा न्याय कथाकार आपल्या पात्रांच्या माध्यमातून साकारतो. 'पाणी' या कथेतून सपना कोंढरे ही बालकथाकार मराठवाड्यातील पाण्याचे दुर्भिक्ष आपल्या कथेतून सांगते. राक्षसभुवन नावाचं गाव होतं. म्हणजे ज्या गावातील ही कथाकार आहे त्याच गावाची गोष्ट ती सांगते. गाव खूप चांगलं होतं. पण त्या गावात खूप कमी पाऊस पडायचा त्यामुळे त्या गावात खूप कमी पाणी असायचं. पाणी संपल्यामुळे गावातील दोन भावंडांना आजीच्या गावी जाऊन राहावे लागण्याची एक बिकट परिस्थिती ही कथाकार चितारते आणि ही केवळ कल्पना नसून मराठवाड्यातील अनेक गावांची वस्तुस्थिती आहे. कल्पनेचा माध्यमातून अशाप्रकारे समाजाचं वर्तमानाचं आणि भविष्याचं अवलोकन ही चिमुकली कथाकार मुलं करत असतील तर ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

कविता कथा-कादंबरीकार कल्पनेच्या जोरावर वस्तुस्थितीचा आधार घेत एका वेगळ्याच विश्वाची निर्मिती करत असतात. हे दुसरे जग म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून याच जगातील कमीअधिक झाल्यानंतर दिसणाऱ्या परिणामांची कल्पना आहे. ग्रामीण भागातील मुलांकडे निरीक्षणाला प्रचंड वाव आहे. ग्रामीण समाज, संस्कृती, जाती, सण - समारंभ, उद्योग - व्यवसाय, पर्यावरण, भौतिक असुविधा या सर्व गोष्टींचा परिणाम ही मुलं बघत असतात, सोसत असतात किंवा अभावामुळे या सर्व गोष्टी कल्पनेत भागवून नेतात. अशाच परिस्थितीत वावरणाऱ्यांना अभिव्यक्तीची जास्त आवश्यकता असते. तिथेच अभिव्यक्तीला एक तीक्ष्ण धार निर्माण होण्याची शक्यता असते. शालेय पातळीवर विद्यार्थ्यांच्या उपलब्ध अनुभव, वाचन आणि परिस्थितीचा फायदा घेऊन विषय पुरवल्यास उत्तम - उत्तम कथा, पटकथा, कविता, चित्रपटकथा हाती लागू शकतील. व्यवसायिक अभिव्यक्तीला वगळून नवख्या निरागस अभिव्यक्तीला डोळसपणे स्वीकारण्याची आवश्यकता आहे. प्रवीण काळम पाटील आणि अशोक निकाळजे यांनी संपादित केलेल्या या बाल कथाकारांच्या 'गंमत गोष्टी' पुस्तकाला चित्रकार प्रतीक सदाफुले या नववीच्या विद्यार्थ्याने रेखाटलेले एक देखणे मुखपृष्ठ मिळाले आहे. हा प्रयोग राक्षसभुवन शनीचे या एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेपूरता न राहता, तो इतर शाळांनी, महाविद्यालयांनी अनुकरण करावा असा आहे. त्यातून मराठी भाषेला त्या-त्या परिसराचे एक वैविध्यपूर्ण लेणे चढेल. मराठी भाषेच्या शाळा बंद करून भाषिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक असे मोठे नुकसान होणार आहे. तर विद्यार्थ्यांच्या अशा अभिव्यक्तीने मराङ्गी भाषेला समृद्ध करणारा एक व्यापक पट समोर येणार आहे. सध्या शिक्षणातील बहुचर्चित ज्ञानरचनावाद, मातृभाषेतील बंद पडत चाललेल्या शाळा, जिल्हा परिषद शाळा समोर उभे असलेले आव्हान, साहित्यिक म्हणून मूठभरांची चलती या सर्व गोष्टींना हे छोटेखानी पुस्तक म्हणजे एक क्रांतिकारी कृती उत्तर आहे असे मला वाटते.